**रोजगार हमी योजना-** जवाहर विहीर लाभार्थी निवडीबाबतच्या जिल्हा व तालुका समन्वय समितीमध्ये सुधारणा करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन,**
**नियोजन विभाग,**
**शासन निर्णय क्र. विपआ-२००९/प्र.क्र. ३०८/पुनर्बा.५७/२०१२/रोहयो-५**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक : १६ सप्टेंबर, २०१३.**

**पहा —**

१) शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक — जविका-१२९८/प्र.क्र.१०४/रोहयो-१०, दिनांक १.७.१९९९.
२) शासन निर्णय नियोजन विभाग क्रमांक — जविका-२०००/प्र.क्र.६/रोहयो-१०, दिनांक २४.८.२०००.
३) शासन निर्णय नियोजन विभाग क्रमांक — जविका-२००२/प्र.क्र.६८/रोहयो-१०, दिनांक २४ मे, २००२.

**प्रस्तावना :-**

रोजगार हमी योजनेअंतर्गत वैयक्तिक लाभाच्या योजनेसाठी राज्यात जवाहर विहीर कार्यक्रम राबविण्यात येत आहे. जवाहर विहीर कार्यक्रमांतर्गतची मार्गदर्शक तत्वे शासन निर्णय दिनांक १.७.१९९९ अन्वये निश्चित करण्यात आली आहेत. जवाहर विहीर योजनेअंतर्गत लाभार्थी निवडीची पध्दती शासन निर्णय दिनांक १.७.१९९९ मधील अ.क्र.(८) येथे देण्यात आली आहे. सदर अ.क्र.(८) संदर्भात मा. उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद खंडपीठ यांनी दिलेल्या निर्णयानुसार, रोहयोअंतर्गत जवाहर विहीर कार्यक्रमासाठी लाभार्थी निवडीची सुधारीत पध्दती शासन निर्णय दिनांक २४ मे, २००२ अन्वये लागू करण्यात आली आहे. त्यानुसार जवाहर विहीर लाभार्थी निवडीसाठी जिल्हा व तालुका समन्वय समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. सदर जिल्हा व तालुका स्तरावरील समन्वय समित्यांमध्ये विधानपरिषद सदस्यांचा समावेश करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासन पुढीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

**शासन निर्णय :-**

शासन निर्णय नियोजन विभाग क्रमांक — जविका-२००२/प्र.क्र.६८/रोहयो-१०, दिनांक २४ मे, २००२ अन्वये रोहयोअंतर्गत घेण्यात येणा-या वैयक्तिक लाभाच्या योजनेखाली जवाहर विहीर कार्यक्रमासाठी लाभार्थी निवडीची सुधारीत पध्दत विहीत करण्यात आली आहे. त्यानुसार जवाहर विहीर लाभार्थी निवडीसाठी जिल्हा समन्वय समिती व तालुका समन्वय समिती स्थापन करण्यात आल्या आहेत. आता सदर जिल्हा समन्वय समिती व तालुका समन्वय समितीची रचना पुढीलप्रमाणे असेल—

**(अ) जवाहर विहीर लाभार्थी निवड जिल्हा समन्वय समिती**

| | | |
|---|---|---|
| १) | पालकमंत्री | अध्यक्ष |
| २) | विधानसभेचे जिल्ह्यातील आमदार | आमंत्रित |
| ३) | विधानपरिषदेचे जिल्ह्यातील आमदार | आमंत्रित |
| ४) | अध्यक्ष, जिल्हा परिषद | सदस्य |
| ५) | उपाध्यक्ष, जिल्हा परिषद | सदस्य |
| ६) | जिल्हाधिकारी | सदस्य |
| ७) | मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. | सदस्य |
| ८) | अतिरिक्त मु.का.अ., जि.प. | सदस्य |
| ९) | कार्यकारी अभियंता (सिंचन)जि. प. | सदस्य सचिव |

२......

**(ब) जवाहर विहीर लाभार्थी निवड तालुका समन्वय समिती.**

| | | |
|---|---|---|
| १) | तालुक्यातील विधानसभेचे आमदार | अध्यक्ष |
| २) | विधानपरिषदेचे तालुक्यातील आमदार | आमंत्रित |
| ३) | पंचायत समितीचे सभापती | सदस्य |
| ४) | पंचायत समितीचे उपसभापती | सदस्य |
| ५) | उप जिल्हाधिकारी (रोहयो) | सदस्य |
| ६) | तहसिलदार | सदस्य |
| ७) | गटविकास अधिकारी पंचायत समिती | सदस्य सचिव |

**टिप:-** एका तालुक्यात एकापेक्षा अधिक विधानसभेचे आमदार असतील तर ज्या विधानसभा सदस्यांच्या क्षेत्रात खेड्यांची संख्या सर्वात अधिक असेल ते अध्यक्ष म्हणून राहतील व इतर सहअध्यक्ष म्हणून राहतील.

रोहयोअंतर्गतच्या जवाहर विहीर कार्यक्रमासाठी लाभार्थी निवडीच्या बाबत शासन निर्णय दिनांक १.७.१९९९, २४.८.२००० व २४.५.२००२ मध्ये दिलेले इतर आदेश, सूचना व मार्गदर्शक तत्वे आहेत तीच राहतील.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावांने,**

**( नितीन पालकर )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१) मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव
२) सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव
३) सर्व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४) सर्व विधानसभा सदस्य/विधान परिषद सदस्य. (संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत)
५) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन.
६) सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, महाराष्ट्र शासन.
७) सर्व विभागीय आयुक्त
८) आयुक्त, कृषी, महाराष्ट्र राज्य, पुणे.
९) सर्व जिल्हाधिकारी.
१०) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
११) उपसचिव, महाराष्ट्र विधानमंडळ, रोहयो समिती.
१२) संचालक, भू-जल सर्वेक्षण विकास यंत्रणा, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३) सर्व विशेष कार्य अधिकारी (रोहयो), विभागीय आयुक्त कार्यालय.
१४) सर्व उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय.
१५) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
१६) पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७) नियोजन विभागातील सर्व अधिकारी (रोहयो प्रभाग)
१८) निवडनस्ती, रोहयो-५

F:\२०१३\General\Jawahar Vihir\G.R. Samiti.docx